दै. पुढारी ३२. ३. २००५

# कमला महाविद्यालयात व्याख्यानाचे आयोजन

कोल्हापूर, दि. ११ : येथील कमला महाविद्यालयामध्ये व्यक्तिमत्त्व विकास व स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन विभागाच्या वतीने डॉ. आर. व्ही. भोसले यांचे अवकाश संशोधनातील संधी या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. क्रांतीकुमार पाटील हे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. सौ. व्ही. व्ही. मैंदर्गी यांनी केले तर आभार सौ. एन. एस. धुमाळ यांनी मानले. कार्यक्रमाचे संयोजन प्रा. ए. एम. सांळोखे यांनी केले. यावेळी विद्यार्थीनी व प्राध्यापक उपस्थित होते.